# रांगोळी

PAGE No. DATE / /

रांगोळी म्हटली कि शेणानी सारवलेल्या अंगणात सुंदर सुबक ठिबक्यांची रांगोळी डोळ्यासमोर येते. रांगोळी जर ती ठिबक्यांची असेल तर ते थेंब अगदी एका रेषेत घेऊन त्याची सुबद्ध जोडणी, नक्षी, रेषा कशिक एकसारख्या आणि रंगसंगती उत्तम असेल तर ती लहान असो वा मोठी एकदम नजरेत भरते आणि आनंद वाटतो.

आपल्या भारतीय संस्कृतीचे प्रतिक असणारी ही रांगोळी प्रत्येक प्रांतापरत्वे वेगवेगळी पण उद्देश एकच. शुभ, मांगल्याचं प्रतिक! रोजची आणि कार्यप्रसंगाची ह्यातही फरक! रोज रंग न भरता नुसत थेंबभर कुंकू पांढऱ्या रांगोळीवर घातलं तरी पुरे! पण कार्यप्रसंगी नुसता गालीचाच, पाहून मन प्रसन्न होतं.

आजकाल खुप निरनिराळे प्रकार पहायला मिळतात. नक्षीदार पान, फुल, पक्षी, सीनासिनरी, थोर विभूतींच्या प्रतिकृती हेही पहायला मिळतं, निरनिराळ्या वस्तुंपासूनही रांगोळ्या तयार करतात आणि निरनिराळ्या माध्यमाद्वारे आपल्यापर्यंत येतंही सगळं!

संस्कारभारतीच्या खुप मोठाल्या, सुंदर रांगोळ्यांनी सगळ्यांना आकर्षित केलय. लहानापासून मोठ्यांपर्यंत सगळेच जण त्या रांगोळ्या आढजुलेनी रेखाटतात तेही आपल्या परंपरेतल्या चिन्हांसहीत! तेव्हा त्यांच्या कल्पकतेला आणि कुशलतेला दाद द्यावीशी वाटते! आणि त्याचबरोबर आपल्या पूर्वजांच्या दुरदर्शीपणाला करावा तो आणि तेवढा सलामही कमीच!

सौ. उज्वला प्रभुणे
अमरावती

